सोमवार
दि. २८ नोव्हेंबर २०२२
मुल्य २ /- रूपये
पृष्ठ ४
वर्ष ५ वे अंक ४८
Postal Reg. No : G2/47/CHA-304/2022-23
चंद्रपूर । वर्धा । गडचिरोली । यवतमाळ जिल्ह्यातील एकमेव मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com
RNI. MAHMAR/2018/77866
संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे
Scan QR code to visit... Epaper Portal

# डॉ. तात्याराव लहाने हे चमत्कारिक व्यक्तिमत्व : डॉ.विकास आमटे

## विनामूल्य मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न, ३५०० नागरिकांनी घेतला नेत्रतपासणीचा लाभ



**वरोरा / प्रतिनिधी**

आईने दिलेल्या किडनीच्या बळावर संपूर्ण जीवन मानवसेवेला समर्पित करणारे डॉ. तात्याराव लहाने हे माझ्यासाठी चमत्कारिक व्यक्तिमत्त्व आहे, असे प्रतिपादन महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे यांनी केले. डॉ. विकास आमटे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जे.जे. हॉस्पिटल, मुंबई; व्हिजन प्लस, राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण व दृष्टिक्षिणता कार्यक्रम; महारोगी सेवा समिती, वरोरा व समता फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आनंदवन येथे आयोजित विनामूल्य मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते.

मंचावर नेत्ररोगतज्ज्ञ पद्‌मश्री डॉ.तात्याराव लहाने, जे जे हॉस्पिटलच्या नेत्र विभाग प्रमुख डॉ. रागिणी पारेख, सीतारमण लेप्रसी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय पोळ, महारोगी सेवा समितीचे सहसचिव कौस्तुभ आमटे, पल्लवी आमटे, डॉ.पठारे उपस्थित होते.

डॉ. आमटे पुढे म्हणाले की, डॉ.तात्याराव लहाने यांनी आनंदवनात शिबिराच्या माध्यमातून हजारो शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडल्या आहेत. बाबा आमटे हे डॉ.लहाने यांच्या शिबिराला 'लहानु बाबांची जत्रा' असे संबोधित असत. पाच, सहा वर्षांच्या ब्रेकनंतरही कोणत्याही प्रचाराशिवाय हजारोंच्या संख्येने होणारी उपस्थिती पाहता या क्षेत्रातील गरीब, वंचित व आदिवासी व्यक्तींच्या उपचारासाठी अत्याधुनिक सोयीसुविधायुक्त मोठा दवाखाना उभारण्याची गरज आहे, असे ते म्हणाले. समाजातील हे चित्र पाहता आनंदवनाच्या तिसऱ्या पिढीने सेवेच्या क्षेत्रात नवीन स्वप्न पाहून ती प्रत्यक्षात उतरवण्याची तयारी सुरू करावी.

### रुग्णांवर करण्यात आली शस्त्रक्रिया



■ या शिबिरात ३ हजार ५०० लोकांची नेत्र तपासणी करण्यात आली . या पैकी ५५० रुग्णांवर २५ व २६ नोव्हेंबरला नेत्ररोगतज्ज्ञ पद्‌मश्री डॉ.तात्याराव लहाने, जे जे हॉस्पिटलच्या नेत्र विभाग प्रमुख डॉ. रागिणी पारेख, यांनी शस्त्रक्रिया केली . या शिबिराचा समारोप २७ नोव्हेंबर ला पार पडला.

आनंदवनाच्या स्वप्नपूर्तीसाठी जनसामान्यांनी, विद्यार्थ्यांनी आणि डाक्टरांनी तन, मन, धनाने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

डॉ. लहाने म्हणाले की, डॉ. विकास आमटे यांचा नुकताच ७५ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यांना १०० वर्षाचे आयुष्य लाभण्यासाठी तुमचे आशीर्वाद मिळावे, यासाठी सदर शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शिबिरासाठी मुंबईहून जे जे हॉस्पिटलची ४० लोकांची टीम, सोबतच समता फाऊंडेशन, व्हिजन प्लस, एनपीबीसी, चंद्रपूर टीम आशीर्वाद घ्यायला आली आहे, असे त्यांनी नमूद केले.

# टाळ मृदूंगाच्या गजरात दुमदुमले नंदोरी गाव

## श्री साईनाथ महाराज मूर्ती प्रतिष्ठापणा निमित्य गावात निघाली पालखी



**वरोरा / प्रतिनिधी**

श्री साईबाबा देवस्थान नंदोरी (बु) येथे २७ नोव्हेंबर रोज रविवारला श्री साईनाथ महाराज मूर्ती प्रतिष्ठापणा निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी साईबाबा यांची पालखी गावातून काढण्यात आली या पालखी सोहळ्यात परिसरातील गावातील अनेक भजन मंडळाने सहभाग घेतला होता. या पालखी सोहळ्यामुळे भजनात वाजणाऱ्या टाळ मृदूंगाने नंदोरी गाव दुमदुमले होते.

सकाळी ७ वाजता परिसर स्वछता, सकाळी ९ वाजता पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला उद्‌घाटक म्हणून समाजसेवक तथा उद्योजक रमेश राजूरकर, अध्यक्ष म्हणून सीडीसीसी बँकेचे संचालक रवींद्र शिंदे, नंदोरी येथील सरपंच शरद खामनकर, उपसरपंच मंगेश भोयर, सामाजिक कार्यकर्ते चंदू वासाडे, माजी सरपंच घनशाम ढवस, माजी उपसरपंच विनोद लांबट, माजी उपसरपंच भानुदास ढवस, माजी तंटामुक्ती अध्यक्ष स्वनिल लांबट, माजी तंटामुक्ती अध्यक्ष रमेश तिखट, राजू एकरे, आनंदराव जिवतोडे, मनीष ठक, संजय पुनवटकर, रवींद्र जिवतोडे हे उपस्थित होते. या वेळी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

रविंन्द्र शिंदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आई वडिलांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा असून प्रत्येकाने आई वडिलांची सेवा करावे अशी उपस्थितांना विंनती केली. संस्थेच्या माध्यमातून चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती ही त्यांनी आपल्या भाषणातून दिली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फित कापून पालखी सोहळ्याचे उद्‌घाटन करण्यात आले .

# एकोणा कोळसा खाणी विरोधात प्रकल्पग्रस्तांचे मुंडन आंदोलन

## तीन दिवसात मागण्या पूर्ण न झाल्यास साखळी आमरण उपोषणाचा इशारा




**वरोरा / प्रतिनिधी**

वेकोलीच्या एकोणा कोळसा खाणीतील प्रकल्पग्रस्तांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात न्याय मागण्यासांठी दि.२४ नोव्हेंबरला दिवसभर वेकोलीच्या विरोधामध्ये आंदोलन करण्यात आले. यावेळी एकोणा कोळसा खाणीच्या प्रकल्पग्रस्तांनी मुंडन आंदोलन करून वेकोलीचा निषेध केला.

एकोना कोळसा खदान संघर्ष समितीद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन दिले असता ते निवेदन त्यांनी स्वीकारले. परंतु संध्याकाळपर्यंत कोणत्या प्रकारच्या मागण्या न्याय मान्य न झाल्याने सायंकाळी पाच वाजता सुमारे ५० प्रकल्पग्रस्तांनी मुंडन करून वेकोलीचा निषेध नोंदविला.

एकोणा खदान मधील या परिसरातील नागरिकांना एकोना खदानमुळे अनेक समस्याचा सामना करावा लागत आहे. आतापर्यंत कंपनीने कुठल्याही सुविधा या प्रकल्पग्रस्त गावांना दिल्या या प्रकल्पग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्यात यावे, माढेळी ते वरोरा व नागरी ते माढेळी रोडची दुरुस्ती करून द्यावी, प्रकल्प असलेल्या मार्गावर ॲम्बुलन्स, अग्निशामक वाहन २४ तास उपलब्ध ठेवावे. गावात जाण्याकरिता सिमेंट कॉंक्रीटचे रोड, मुख्य रस्त्यापासून ते गावापर्यंत स्ट्रीट लाईट, प्रकल्पग्रस्त गावातील बेरोजगारांना नोकरीच्या संध्या उपलब्ध करून द्यावी तसेच प्रकल्पबाधित गावातील अंतर्गत करण्यासाठी सीएसआर फंड उपलब्ध करून देण्यात यावा. ग्रामपंचायत एकोना व लगतच्या गावाला खनिज निधी उपलब्ध करून द्यावा, कोळसा खदान मध्ये होत असलेल्या विस्फोटाने गावातील घरांना भेगा पडल्या आहेत. त्याची नुकसान भरपाई देण्यात यावी. परिसरात होत असलेल्या प्रदूषणावर कंपनीने नियंत्रण करावे. कंपनीतील कंत्राटदार कंपनी महालक्ष्मी तथा अरुणोदय कंपनीने स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अश्या अनेक मागण्या निवेदनातून करण्यात आल्या होत्या. मात्र वेकोलीकडून कुठलाही प्रतिसाद मिळत नसल्याने प्रकल्पग्रस्त संतप्त झाले. या मागण्यांसंदर्भात कंपनी व्यवस्थापनासोबत अनेक बैठका झाल्या. या बैठकांमधून आश्वासन देऊन वेळ काढू धोरण कंपनीने अवलंबले असल्याचा आरोप संघर्ष समितीने केला आहे.

एकोना कोयला खदान संघर्ष समिती अध्यक्ष सरपंच गणेश चवले, जिल्हा बँकेचे संचालक डॉ. विजय देवतळे, ॲड. अनिल ठाकरे, सुनंदा जीवतोडे, अरुणा खंडाळकर, नरेंद्र ठाकरे, सरपंच देवानंद महाजन, खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष साहेबराव ठाकरे व संचालक संचालक बाळू भोयर, सरपंच चंद्रकला वनशिंगे, सरपंच योगिता पिंपळशेंडे, सरपंच शालू उताणे, सचिन बुरडकर उपसरपंच, सरपंच मंगला लेवादे, सरपंच निर्मला दडमल, सरपंच जयश्री चौधरी, आणि या परिसरातील नागरिक पत्रकार आंदोलनात सहभागी झाले होते.

# मारेगाव येथील माधव नगरीला चौदा वर्षांपासून वनवास

## मूलभूत सुविधा वंचित, महिलांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन ,उपोषणाचा ईशारा




**गजानन देवाळकर / मारेगाव**

स्थानिक प्रभाग क्रमांक सहा मधील माधव नगरी वसाहतीकरिता सण २००८ साली निर्माण करण्यात आली असुन विकासकामे करण्यात प्रशासनाने दुर्लक्ष केले आहेत, घाणीचे साम्राज्य तयार झाले असुन डासाचा प्रादुर्भाव वाढल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहेत. असे येथिल महिलांनी मुख्यधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहेत.

मारेगाव शहरातील प्रभाग क्रमांक सहा मध्ये येणाऱ्या माधव नगरी वसाहतीत गेल्या चौदा वर्षांपासून मूलभूत सुविधा पुरविल्या गेल्या नाहीत. नगरपंचायत प्रशासनाला सर्व प्रकारचा कर भरणा करून सुविधेपासून वंचित ठेवले जाते. रस्ते, नाल्या, नळ योजना येथे पोहचली नाही. सांडपाणी साचल्याने दुर्गंधी सुटली असुन डासाचा प्रादुर्भाव वाढला आहे. झाडे झूडपे वाढली असुन रस्त्यावर आली आहेत. पावसाळ्यात चिखलाचे स्वरूप आले असता साध्या मुरमाची यावर डागडुजी केली नाही. आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असुन. नगरपंचायत प्रशासन आणि या प्रभागातील नगरसेवक हेतूपूरस्पर दुर्लक्ष करीत असल्याचा ठपका येथिल महिलांनी ठेवला आहेत. विकासकामे आणि सुविधा पुरविल्या नाही तर नगरपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा ईशारा निवेदनातून केला आहे. नगरपंचायत मारेगावचे नगराध्यक्ष डॉ. मनिष मस्की, प्रभारी मुख्याधिकारी अभिजित वायकोस यांना निवेदन देण्यात आले. यावेळी वंदना बोन्डे, अरुणा ठाकरे, अंजली आत्राम, स्वाती आत्राम, सिंधू बेसकर, शितल राजगडे, लीना पोटे, अनिता कळंबे यासह प्रभाग क्रमांक सहा मधील माधव नगरी येथिल महिला उपस्थित होत्या.

## दत्तक गावातील जि.प.शाळेचं रूप पालटलं

# बकाल भिंतीवर पोलिसांनी चढवला साज

**महेश गुंडेटीवार / गडचिरोली**




अस्वच्छतेमुळे बकालपण आलेल्या अनेक भिंती आपल्याला खेड्यापाड्यात पाहायला मिळतात. अशाच भिंतीला नवं रूप देण्याचे काम मरपल्ली पोलिसांनी केले. त्यामुळे अहेरी तालुक्यातील शेवटच्या टोकावर वसलेल्या मरपल्ली पोलीस मदत केंद्र हद्दीतील भस्वापूर गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे रूप पालटले आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जिमलगट्टा अंतर्गत समाविष्ट पोलीस मदत केंद्र मरपल्ली हद्दीत येत असलेल्या भस्वापूर या अतिदुर्गम व आदिवासीबहुल गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत ही अत्यंत दयनीय अवस्थेत होती. मागील अनेक वर्षांपासून येथे शाळेच्या इमारतीला व वॉल कंपाउंडच्या भिंतींना रंगरंगोटी केला नव्हता. याठिकाणी १ ते ४ पर्यंत एकूण २२ विद्यार्थी शिक्षण घेतात. स्वछतेचा अभाव, रंगरंगोटी नसल्याने काळ्या झालेल्या भिंती, लाईट असूनही जीर्ण झालेली वायरिंग आणि आदी समस्या मरपल्ली पोलीस मदत केंद्राचे प्रभारी अधिकारी संतोष जायभाये यांच्या पेट्रोलिंग दरम्यान लक्षात आले. लगेच त्यांनी श्रमदानातून शाळेचा रूप पालटण्याचा निणर्य घेतला आणि चुना, गेरू, ब्रश, ऑईल पेंट तसेच पंखा, लाईट, इलेक्ट्रॉनिक साहित्य घेऊन त्यांनी आपल्या जवानांना घेऊन चक्क भस्वापूर गावात ढेरा टाकला. आपले जवान, एसआरपीएफ चमू तसेच येथील सरपंच अरुण वेलादी, गावातील युवापिढी घेऊन स्वच्छता मोहीम राबविली. एवढेच नव्हेतर आपल्या जवानांमध्ये असलेल्या कलागुणांना ओळखून रंगरंगोटी तसेच शाळेची वायरिंग पूर्ण करून घेतले. मागील अनेक वर्षापासून समस्याग्रस्त असलेल्या शाळेच्या इमारतीचा रूप पालटल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. येथील सरपंच अरुण वेलादी, शिक्षिका डंबारे आणि गावकऱ्यांनी पोलिसांचे आभार मानले.

गडचिरोली जिल्हा हा आदिवासीबहुल व नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जातो. येथे पोलिसांना डोळ्यात तेल टाकून सेवा द्यावी लागते. नक्षल्यांच्या कारवायांवर अंकुश ठेवण्यासाठी गडचिरोली पोलीस दलास अनेक प्रयोग करावे लागले. त्यानंतरच पोलिसांना सकारात्मक निकाल समोर आला. त्यासोबतच येथील आदिवासींना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, येथील बेरोजगार युवकांच्या हाताला काम देण्यासाठी पोलीस विभागातर्फे विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. रोजगार मेळाव्यातून बरेच युवक -युवतींच्या हाताला काम मिळाल्याने जिल्ह्यातील बेरोजगारांना नक्षल चळवळीपासून दूर ठेवण्यात पोलिसांना यश आलं आहे. 'पोलीस दादालोरा खिडकी' उपक्रमातून अनेकांना मोठा फायदा झाल्याचे दिसून आले. आता पोलीस दलामार्फत 'दत्तक गाव योजना' राबविण्यात येत असून त्यामाध्यमातून पोलीस स्टेशन, उप पोलीस स्टेशन आणि पोलीस मदत केंद्र हद्दीतील एखादं गाव दत्तक घेऊन गावातील समस्या जलद गतीने सोडविण्याचे प्रयत्न केले जाणार आहे.

> "भस्वापूर हे गाव गडचिरोली पोलीस दला मार्फत राबविण्यात येत असलेल्या दत्तक गाव योजनेत समाविष्ट असून या गावातील जिल्हा परिषद शाळेची अवस्था पेट्रोलिंग दरम्यान लक्षात आली. शासनाच्या विविध योजना असल्या तरी अनेक प्रश्न गावात असतात. त्याची सोडवणूक जलद गतीने कशी होईल यासाठी जिल्हा पोलीस दल 'दत्तक गाव योजने'तून प्रयत्न करणार आहेतच. मात्र, विद्यार्थ्यांचे ज्ञान मंदिर चांगले असावे यासाठी आमचं छोटंसं प्रयत्न होतं. स्वछता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केले, शाळेच्या इमारतीचे व वॉल कंपाउंड चे रंगरंगोटी केले. विशेष म्हणजे वीज पुरवठा असूनही मागील १० वर्षांपासून जीर्ण अवस्थेत असलेली वायरिंग दुरुस्त करून नवीन पंखा व लाईट लावण्यात आले. यासाठी पोलीस अधीक्षक निलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक अनुज तारे, कुमार चिंता, यतीन देशमुख आणि विभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले.
>
> **संतोष जायभाये, प्रभारी अधिकारी पोमके, मरपल्ली**



# विनानंबरच्या सुसाट पळणाऱ्या वाहनांचा शहरात सैराट!

प्रासंगिक



डॉ.यशवंत घुमे
मो. ९८२२२३३९१२
e sahyandrinews@gmail.com

**सा**र्वजनिक रस्त्यावरील वाहतूक सुरळीत चालण्यासाठी शासनाने वाहन चालकांसाठी सुरक्षिततेचे काही नियम तयार केले आहेत. त्या नियमांचे पालन करावे अशी सर्व वाहन चालकांकडून अपेक्षा केली जाते. आपातकालीन परिस्थितीत वा वाहन नेमके ओळखण्यासाठी प्रत्येक वाहनांना प्रादेशिक परिवहन विभागातर्फे म्हणजे आरटीओ कडून एक विशिष्ट नंबर दिला जातो. तो नंबर वाहनाच्या मागील आणि समोरील बाजूस सुस्पष्ट अक्षरात दिसेल अशा पद्धतीने पाटीवर लिहावा असाही नियम आहे. परंतु अलीकडे भद्रावती शहरामध्ये अनेक दुचाकी वाहनांवर, गाडीवर नंबर न लिहिण्याची जणू काही फॅशन तयार आली आहे की काय? असे वाटावयास लागते. रस्त्याने चालताना अनेक बिनानंबरची वाहने रस्त्यावरून सुसाटपणे धावत असतात. कर्कश आवाज करीत बेधुंद धावणाऱ्या या वाहनांमुळे रस्त्यावरून चालताना बालके, स्त्रिया आणि वयोवृद्ध नागरिक दचकून अनेकदा अपघाताला सामोरे जावे लागते. होणाऱ्या घटना किरकोळ असल्याने कोणी पोलिसात जात नसले तरी या घटनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. रस्त्यावर बेधुंद, बेदरकारपणे वाहने पळविणाऱ्या वाहन चालकांवर पोलीस विभागातील वाहतूक पोलिसांनी कारवाई करणे अपेक्षित आहे.

वाहतूक पोलिसांनी शहरातील मुख्य मार्गावर नियमानुसार कारवाई केली तर निम्म्याहून निम्मे अपघात आपोआप कमी होतील आणि बेधुंद वाहने पळवणाऱ्यांवर वचक बसेल. पोलिसांच्या धाकाने वाहन चालक वेग मर्यादा मर्यादित ठेवून वाहने चालवतील. पोलीसी धाकामुळे वाहनचालक शिस्तीत वाहने चालवतील. परिणामतः होणाऱ्या संभाव्य दुर्घटना टाळता येईल. परंतु भद्रावती शहरात मात्र वाहतूक पोलीस विभागाला लक्ष द्यायला वेळ नाही असे दिसते. भद्रावती येथे पोलीसांचा वाहतूक विभाग आहे. परंतु त्यांना शहराशी काही देणे घेणे नसते. शहरात वाहतूक पोलीसच दिसतं नसल्याने नियम मोडणाऱ्यांना पोलिसांचा धाकच उरला नाही. वाहतूक विभागातील पोलिसांचे सारे लक्ष टप्प्यावरील चंद्रपूर नागपूर महामार्गावर लागलेले असते. जेव्हा तेव्हा हे पोलीस केवळ टप्प्यावरच आपले कर्तव्य बजावत असतात. परिणामतः शहरातील अंतर्गत वाहतुकीकडे मात्र दुर्लक्ष होत असते असा नागरिकांचा आरोप आहे. शहरातील नागरिकांच्या संपत्तीचे आणि जीवाचे रक्षण करणे ही पोलिसांची कर्तव्ये आहेत. कोणाच्याही जीवास धोका होऊ नये यासाठी पोलीस विभागाने तत्पर असणे अपेक्षित आहे. मात्र भद्रावती शहरात बिना नंबरच्या गाड्या बेधुंदपणे धावत असताना पोलीस विभाग दखल घेताना दिसत नाही. अनेकदा अशा बिना नंबर गाड्यांचे वाहनचालक मोबाईलवर बोलत बेधुंदपणे गाड्या पळवितात. अचानक वाहन जवळून गेल्याने दचकून ज्येष्ठांना नको त्या अवस्थेला सामोरे जावे लागते. शहरातील अशा विना नंबरच्या वाहनांवर पोलिसांनी नियमितपणे कारवाई करावी. रस्त्यावरून धावणाऱ्या प्रत्येक गाडीमालकाला वाहनावर नंबर टाकणे अनिवार्य करावे. जेणेकरून आपात्कालीन परिस्थितीत अपघात करणाऱ्या वाहनाचा नंबर कोणालाही टिपून घेता येईल. आरोपी शोधण्यास मदत होईल. अनेकदा या वाहनावर नंबर नसल्यामुळे ते वाहन कोणाचे आहे? याची माहिती पडत नाही. परिणामतः बीनबोभाटपणे वाहन पळविणारा ओळखता येत नाही. भद्रावती शहरातील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि बालक यांची भद्रावती पोलिसांना अशी मागणी आहे की, ज्याप्रमाणे चंद्रपूर नागपूर महामार्गावर वाहतूक पोलीस कर्तव्यरत असतात तसेच अधूनमधून भद्रावती शहरातील अंतर्गत वाहतुकीकडेही लक्ष द्यावे. बिना नंबरच्या गाड्यांचा बंदोबस्त करावा. तसेच वाहन चालविताना मोबाईलचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करावी. जर असे झाले तर वाहन चालक कायद्याचे पालन करतील. परिणामतः नागरिकांची जीवन सुरक्षित राहील. नागरिकांच्या या मागणीकडे पोलीस विभाग किती लक्ष देतो याकडे सगळ्यांचे लक्ष लागलेले आहे. या मागणीसाठी निदान जेष्ठ नागरिकांच्या संघटनांनी पुढाकार घेऊन पाठपुरावा केला पाहिजे. कायद्याचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध असणारा पोलिस विभाग नेमका याकडे का बरं दुर्लक्ष करत असेल हाही कोड्यात टाकणारा प्रश्न आहे.



# संवैधानिक मूल्यांची जपणूक करत समाजाच्या सर्वकष उत्कर्षासाठी कटिबद्ध राहण्याचा सर्वांनी निश्चय करावा! : जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे

## घुग्गुस येथील जि. प. उच्च प्राथमिक (मुली) शाळेत संविधान सन्मान दिन साजरा.



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

घुग्घुस येथील जि. प. उच्च प्राथमिक मुलींच्या शाळेत २६ नोव्हेंबरला सकाळी संविधान दिनानिमित्त 'संविधान सम्मान दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस आणि संविधानास पुष्प अर्पण करून प्रमुख पाहुण्यांनी अभिवादन केले.

भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी शाळकरी चिमुकल्यांशी संवाद साधत सर्वांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

पुढे बोलताना, आजच्याचं दिवशी २६ नोव्हेंबर इ.स. १९४९ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना लिहून देशाला अर्पण केली. व पुढे २६ जानेवारी १९५० पासून राज्यघटना अंमलात आली. आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या भारतात भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीने खऱ्या अर्थाने लोकशाहीची प्रस्थापना झाली. त्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून आज देशभर शासकीय, राजकीय तसेच सामाजिक अशा सर्वच क्षेत्रांत विविध कार्यक्रम, उपक्रम आयोजित केल्या जातात.

भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातूनही आज जिल्ह्यात सर्वत्र बूथ स्तरावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून त्याठिकाणी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केल्या जात आहे. तर अनेक ठिकाणी विविध कार्यक्रम आणि रॅलींचेही आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय ही सर्वोच्च मूल्ये आपल्याला प्रदान केली आहेत. या मूल्यांची जपणूक करत समाजाच्या सर्वंकष उत्कर्षासाठी कटिबद्ध राहण्याचा आज आपण निश्चय करूया आणि देशातील लोकशाहीला अधिक मजबूत बनवूया असे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका मोरे, अनिरुद्ध आवळे, मनोहर कवाडे, सरस्वता पाटील आदींसह मोठ्या संख्येने चिमुकल्या विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

# विवेकानंद महाविद्यालयात संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन

**भद्रावती / प्रतिनिधी**



'संविधान हा लोकशाहीचा आत्मा असून आपल्याला लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी संविधानात दिलेल्या मानवी हक्क, अधिकार, कर्तव्ये,नियम व कायद्याचे पालन करावे लागते.अन्यथा स्वातंत्र्याला अर्थ उरणार नाही' असे विचार प्राचार्य डॉ नामदेव उमाटे यांनी व्यक्त केले. ते महाविद्यालयात संविधान दिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. श्री अरविंद सभागृहात आयोजित या कार्यक्रमात यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून इतिहास विभागप्रमुख डॉ. जयवंत काकडे, रासेयो. सहकार्यक्रम अधिकारी डॉ.रमेश पारेलवार, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. बंडू जांभुळकर आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. उमाटे यांनी संविधान दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना संविधानाच्या उद्देशीकेचे सामूहिक वाचन करून संविधानाचे पालन करण्याची शपथ दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बंडु जांभुळकर,संचालन प्रा. अमोल ठाकरे,आभारप्रदर्शन प्रा.नरेंद्र लांबट यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रकृति संस्थेद्वारा आश्रम शाळा बोर्डा येथे संविधान दिन कार्यक्रम



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

प्रकृती महिला विकास केंद्र चंद्रपूर द्वारा आयोजित शासकीय आश्रम शाळा बोर्डा ता.जि. चंद्रपूर येथे संविधान दिनानिमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पन करून करण्यात आले. सर्वप्रथम सर्व शालेय विद्यार्थ्यांव्दारे रॅली काढण्यात आली. रॅलीत संविधानाचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने जनजागृतीपर घोषवाक्याचा जयघोष करण्यात आला. संपूर्ण गावात संविधान रॅली काढण्यात आली.

कार्यक्रमात मुख्याध्यापक मिलिंद चोपकर, प्रकृति संस्थेच्या भारती रामटेके, संचालक निलेश देवतळे, ग्रा. पं. सदस्या जयश्री देवगडे, माजी सरपंच स्वरूपा जुमनाके, अक्षय देशमुख, अरुणा खोब्रागडे, मंगला घटे, आश्रम शाळेतील शिक्षकगन व विद्यार्थी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन, संविधानासंबंधी पोस्टर प्रदर्शनी, संविधानिक घोषवाक्याचा जयघोष व शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला.

भारती रामटेके यांनी संविधान दिनाचे महत्व, मूलभूत हक्क, मार्गदर्शन तत्व व मूलभूत कर्तव्य यावर मार्गदर्शन केले. निलेश देवतळे यांनी संविधानिक मूल्याचं जतन करणे काळाची गरज यावर मार्गदर्शन केले. तसेच मुख्याध्यापक मिलिंद चोपकर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अक्षय देशमुख, संचालन शिक्षिका मंदा बोरकर यांनी केले तर आभार नांदूरकर यांनी मानले.

# आनंद अंध विद्यालयात 'संविधान दिन' उत्साहात साजरा



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

संविधान निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फार मोठे योगदान असल्यामुळे सदर राज्य घटना ही दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण केली गेली म्हणून तो दिवस कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टीने आनंद अंध विद्यालय आनंदवन प्रार्थना सभागृहात दिनांक २६ नोव्हेंबर २०२२ रोजी' संविधान दिनानिमित्त संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन जसविंदर कौर भाददा या दृष्टिबाधित मुलीने केले त्यानंतर सर्व अंध विद्यार्थ्यांनी संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी अंध विद्यालयाचे मुख्याध्यापक सेवकराम बांगडकर यांनी विचारपुष्प वाहिले, आपल्या प्रास्ताविक भाषणात कलाशिक्षक परमानंद तिराणिक यांनी संविधानाने सर्व भारतीय नागरीकांना दिलेल्या मुलभूत हक्क, नागरिकांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले तर कृष्णा डोंगरवार सरांनी संविधानाचे महत्त्व विशद केले. यावेळी विलास कावणपुरे, वर्षा उईके, तनुजा सव्वाशेरे, राकेश आत्राम इत्यादी शिक्षक मंडळी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी आनंदवनाच्या परिसरात संविधानाचा जागर म्हणून विविध घोषणा देत मिरवणूक काढण्यात आली. यानंतर मुंबई येथे २६ नोव्हेंबर २००८ च्या दहशतवादी हल्यात शहिद झालेल्या भारतीय जवानांना व नागरिकांना दोन मिनिटे मौन पाळून भावपूर्ण श्रद्धांजली देवून कार्यक्रमाची सांगता झाली..

# संविधान दिनानिमित्त विधी सेवा प्राधिकरण तर्फे 'भारताचे संविधान' या विषयावर व्याख्यान



**चंद्रपुर / प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरांच्या अध्यक्ष समृध्दी एस. भीष्म यांच्या मार्गदर्शनानुसार, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि चंद्रपूर जिल्हा बार असोसिएशन, यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त श्री. लालजी जेम्स वकिलांचे 'भारताचे संविधान' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीमती भीष्म यांनी संविधानातील उद्देशिकेचे वाचन करून केली. यावेळी चंद्रपूर जिल्ह्यातील रजेवर असलेले न्यायाधीश हे ऑनलाइन पद्धतीने हजर होते व त्यांनीसुद्धा उद्देशिकेचे वाचन केले.

याप्रसंगी रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन विधीसेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी सचिव यांनी तर आभार जिल्हा वकील संघाचे सचिव आशिष धर्मपुरीवार यांनी केले. कार्यक्रमासाठी सर्व न्यायाधीश, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अभय पाचपोर व इतर पदाधिकारी तसेच ज्येष्ठ वकील व न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आनंदनिकेतन महाविद्यालय आनंदवन, वरोरा येथे संविधान दिन साजरा !

**वरोरा / प्रतिनिधी**

आनंदनिकेतन महाविद्यालय आनंदवन वरोरा येथील राष्ट्रीय सेवा योजना व मराठी विभागाच्या वतीने शनिवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२२ रोजी 'संविधान दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा.डॉ.तक्षशील सुटे हे कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मृणाल काळे होते.




प्रमुख वक्ते म्हणून बोलताना डॉ.सुटे म्हणाले की,' संविधान हा नियमांचा संच आहे.ज्या नियमांच्या संचामध्ये सर्वांना समान अधिकारांमध्ये एकत्रित बांधण्यात आले आहे .संविधान हा राष्ट्रग्रंथ आहे. धर्म स्वातंत्र्य आपल्याला ह्या संविधानाने दिले, परंतु आज या संविधानाची फसवणूक केली जात आहे.आजही संविधानिक नैतिकता निर्माण होऊ शकली नाही अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. फक्त संविधान दिन साजरा न करता हे संविधान आपण सगळ्यांनी स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले.याप्रसंगी संविधान उद्देशपत्रिकेचे वाचन ही करण्यात आले.उद्देश पत्रिकेतील पहिला शब्द आम्ही हा केवळ शब्द नाही तर सगळ्यांना एकत्रित करणारे स्वप्नातील वास्तव आहे असेही मत डॉ. सुटे यांनी व्यक्त केले.

मराठी विभाग प्रमुख प्रा.बबन अवघडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. 'भारताचे संविधान म्हणजे त्यातील केवळ शब्द नव्हे तर या देशातील व्यक्ती केंद्रस्थानी मानून स्वातंत्र्य आणि समतेची आस धरणारा एक जिवंत दस्ताऐवज आहे' व भारताची राज्यघटना हा भारताचा सर्वोच्च कायदा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.विशेष म्हणजे या कार्यक्रमात काही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आपली मते मांडली.

विद्यार्थ्यांनी संविधान समजून व जाणून घ्यायला हवे आणि त्याचे आचरण करणे ही आपली वैयक्तिक जबाबदारी आहे.असे मत प्राचार्य डॉ.मृणाल काळे यांनी अध्यक्षीय समारोपातून केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. पल्लवी ताजने यांनी तर आभार प्रदर्शन निकिता माणूसमारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.मोक्षदा नाईक व प्रा. सुरेश राठोड यांनी मेहनत घेतली. बहुसंख्येने राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# १ डिसेंबरला अजयपूर येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबीर

**चंद्रपूर/ प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीकरिता समाजकल्याण विभागामार्फत स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने १ डिसेंबर रोजी चंद्रपूर तालुक्यातील अजयपूर ग्रामपंचायत येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात नेत्रचिकित्सा, सामान्य आजार, अस्थीरोग तपासणी साठी तज्ञ डॉक्टरांची चमू उपस्थित राहणार असून बी.पी., शुगर, हिमोग्लोबीन यासह इतर तपासण्या व मोफत औषधीचे वितरण करण्यात येणार आहे.

तरी शिबिरामध्ये नागरिकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेवून आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त अमोल यावलीकर यांनी केले आहे.

# नामदार सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्रात संविधान दिन



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

घुग्घुस येथील नामदार सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्रात भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे व भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांच्या मार्गदर्शनात संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी भारतीय संविधान व भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मेणबत्ती प्रज्वलित करीत अभिवादन केले. याप्रसंगी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. यासोबतच २६/११ च्या क्रूर दहशतवादी हल्यात हुतात्म्यांना श्रद्धांजली देण्यात आली.

यावेळी भाजपाचे संजय तिवारी यांनी, बाबासाहेबांनी संविधान दिल्यामुळे आपल्या भारत देशात आज स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय नांदत आहे. भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी हे पवित्र संविधान भारत देशाला अर्पण केले मि संविधानाला व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करतो, असे प्रतिपादन केले.

यावेळी भाजपाचे संजय तिवारी, कुसुमताई सातपुते, बबलू सातपुते, साजन गोहने, सुरेंद्र जोगी, मनमोहन महाकाली, पारस पिंपळकर, पौर्णिमा कांबळे, पार्वती देहारे, शारदा झाडे, वैशाली भालशंकर, छाया पाटील, सुनीता पाटील, सुनंदा लिहीतकर, निशा उरकुडे, लता आवारी, प्रीती धोटे, शीतल कामतवार, खुशबू मेश्राम, उमेश दडमल उपस्थित होते.

# पाणी पुरवठ्याच्या सर्व योजना सौर उर्जेवर कार्यान्वित करा

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार : ग्रामीण पाणी पुरवठा व अमृत योजनेचा आढावा

**चंद्रपूर/ प्रतिनिधी**
पाणी पुरवठा योजना हा नागरिकांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. मात्र अनेक ठिकाणी योजना कार्यान्वित करण्यात आल्यावर प्रलंबित विद्युत देयकांमुळे पाणी पुरवठा बंद पडतो. तरी योजना बंद पडू नये व सर्वांना पाणी मिळावे, यासाठी जिल्ह्यातील पाणी पुरवठ्याच्या सर्व योजना सौर उर्जेवर कार्यान्वित करण्यात याव्या, असे निर्देश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.



नियोजन भवन येथे ग्रामीण पाणी पुरवठा व अमृत पाणी पुरवठा योजनेचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, महानगर पालिकेचे आयुक्त विपीन पालीवाल, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता हर्ष बोहरे प्रामुख्याने उपस्थित होते.

पालकमंत्री मुनगंटीवार पुढे म्हणाले की 'हर घर जल' योजनेद्वारे प्रत्येक गावातील प्रत्येक घरात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा मोठा संकल्प आहे. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात प्रत्येक कुटूंबाला पाणी पुरवठा योजनेचा लाभ मिळावा, यासाठी वेगाने काम करून लवकरात लवकर नळ योजनेचे काम पूर्ण करावे. पाणी पुरवठा योजना मंजूर झालेल्या गावांची तालुकानिहाय यादी सर्व ग्रामपंचायतींना पाठवावी व संबंधित ग्रामपंचायतींनी योजनेचा दर्जा व गुणवत्तेची तपासणी करून घ्यावी. देशात सगळीकडे पाणी पुरवठा योजनांचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यामुळे बांधकाम करण्यासाठी कुशल कामगार उपलब्ध होत नसतील तर जिल्ह्यातील युवकांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देवून त्यांची क्षमता बांधणी करण्याचे नियोजन जिल्हा प्रशासनाने करावे. त्यामुळे पाणी पुरवठ्याची प्रलंबित कामे मार्गी लागतील तसेच स्थानिक तरुणांना रोजगार देखील उपलब्ध होईल, असे पालकमंत्री म्हणाले.

### अमृत योजनेचा आढावा

चंद्रपूर महानगर पालिका क्षेत्रातील प्रलंबित अमृत योजनेशी संबंधीत नळ जोडण्या व रस्ते दुरुस्ती आदीबाबत पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी आढावा घेऊन सर्व कामे फेब्रुवारी पुर्वी पूर्ण करण्याचे निर्देश दिले. अमृत पाणी पुरवठा योजनेंतर्गत कामासंबंधीत नागरिकांच्या अनेक तक्रारी आहे. त्यामुळे योजनेचे काम पूर्ण होईपर्यंत कंत्राटदराला पूर्ण देयके अदा करू नये. तसेच अमृत योजनेच्या कामासाठी खोदण्यात आलेले शहरातील १२० किलोमीटर रस्ते पालिकेने तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

जिल्हा परिषदेद्वारे राबविण्यात येणाऱ्या ३२ प्रादेशिक योजनांपैकी टेकाडी येथील योजनेचे विद्युत देयक न भरल्याने पाणीपुरवठा बंद असल्याचे निदर्शनास आल्यावर नागरिकांना पाणी उपलब्ध होण्यासाठी जिल्हा परिषदेने सदर देयकाचा तात्काळ भरणा करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. तसेच गोंडपिपरी येथील पाणी पुरवठा योजनेपर्यंत रस्ता तयार करण्याचे नियोजन करण्याच्याही सूचना दिल्या.

याप्रसंगी पालकमंत्री यांनी पाणी पुरवठा योजनांची सद्यस्थिती, पुढील नियोजन व अडीअडचणी जाणून त्यावर उपाययोजना सूचविल्या.

जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत सद्यस्थितीत १३०४ योजना मंजूर असून त्यापैकी १३०२ चे अंदाजपत्रक तयार झाले आहेत. यापैकी १२८४ योजनांना तांत्रिक मंजुरी मिळाली आहे. प्रशासकीय मान्यताप्राप्त ८५० योजनांना कार्यरंभ आदेश देण्यात आला असून ७१ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. सदर १३०४ पैकी ३४४ योजना सौर उर्जेवर घेण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे कार्यकारी अभियंता बोहरे यांनी दिली.

# आमदार किशोर जोरगेवार यांनी घेतला विविध विभागाच्या कामांचा आढावा

## जिल्हाधिकारी कार्यालयातील २० कलमी सभागृहात झाली बैठक

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
आमदार किशोर जोरगेवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील विस कलमी सभागृहात विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी विविध विभागाअंतर्गत सुरु असलेल्या मतदार संघातील कामांचा आढावा घेतला. यावेळी महत्वाच्या सुचनाही आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांना केल्या आहे.

या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्र परदेशी, मनपा आयुक्त विपीन पालिवाल, , जिल्हा नियोजन अधिकारी गजानन व्याहाड, आरटीओ किरण मोरे, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी कपील कलोडे, जिल्हा नगर विकास अधिकारी अजित डोके, तहसीलदार निलेश गौड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे



कार्यकारी अभियंता सुनिल मेंढे, घुग्घुसचे मुख्याधिकारी जितेंद्र गादेवार, वाहतुक विभागाचे पोलिस निरिक्षक पी.डी.पाटील, आदी अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

चंद्रपूरातील जटपूरा गेट येथील वाहतुक कोंडी सोडविण्याच्या दिशेने अपेक्षीत अशा उपायोजना करण्यात आलेल्या नाही. त्यामुळे पुन्हा एकदा सदर वाहतुक कोंडी सोडविण्याच्या दिशेने प्रयत्न करा, येथे वाहतुक कोंडी झाल्यास ट्रॅफिक वळविण्यासाठी दिशा दर्शक फलक लावा, फहीम रेस्ट हाउस कडे जाणारा मार्ग तयार करा अशा सुचना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी वाहतुक विभाग तथा मनपा आयुक्त विपीन पालिवाल यांना केल्या आहेत. यासाठी एक समिती तयार करण्याच्या निर्देश जिल्हाधिकारी यांनी सदर बैठकीत अधिकाऱ्यांना दिले आहे. चंद्रपूरात वाहतुक कोंडीची मोठी समस्या जाणवत आहे. पार्किंग व्यवस्था नसल्याने नागरिक रस्त्याकडेला वाहणे पार्क करत असल्याने वाहतुक कोंडी निर्माण होत आहे. त्यामुळे रस्त्याच्या मुख्य मार्गाने उपलब्ध असलेले मोकळे भुखंड पार्किंगसाठी राखीव करा, २०० मिटरवर पार्किंग व्यवस्था उपलब्ध करा, आजाद बागेतील पार्किंग नागरिकांसाठी खुली करा, मुख्य रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सवर प्रतिबंधित घाला आदी सुचना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी महानगरपालिकेला केल्या आहे.

तुकुम येथील स्मशानभुमीसाठी वेकोलिच्या जागेचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे, जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र स्थापण करण्यासाठी चंद्रपूर येथील देगो तुकुम परिसरातील होमगार्ड प्रशिक्षण केंद्रा जवळील जागा मंजुर करण्यात यावी, घुग्घुस येथील नागरिकांना जागेचे कायस्वरुपी पट्टे देण्याची प्रक्रिया गतीशील करण्यात यावी, येथे स्टेडीयमसाठी १० हेक्टर जागा आरक्षीत करण्यात यावी, प्रलंबीत असलेला घुग्घूस बायपासचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा, येथे नागरी सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात आदी सुचनाही यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी सदर बैठकीत केल्या आहे.

# जिल्ह्यातील प्रलंबित सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याला प्रथम प्राधान्य : पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

## अपूर्ण प्रकल्प व निधीबाबत मंत्रालयात पाठपुरावा करणार

**चंद्रपूर/ प्रतिनिधी**
चंद्रपूर जिल्हा हा धान उत्पादकांचा जिल्हा असून धानासाठी पाण्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. त्यामुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात असलेले मामातलाव व मालगुजारी तलावांची दुरूस्ती करून तसेच जिल्ह्याच्या वनक्षेत्रातील अपूर्ण व प्रलंबित सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याला आपले प्राधान्य आहे. तसेच जिल्ह्यातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करून नागरिकांना दिलासा देऊ, अशी ग्वाही पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.



नियोजन भवनात जलसंपदा व जलसंधारण विभागाचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, पाटबंधारे विभागाचे अधिक्षक अभियंता पद्माकर पाटील, जिल्हा जलसंधारण अधिकारी सुभाष आकोसकर, जि.प. जलसंधारण अधिकारी प्रियंका रायपूरे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे, कार्यकारी अभियंता एस.बी.काळे, मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता प्रकाश गायकवाड, राहुल पावडे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री पुढे म्हणाले की, सिंदेवाही तालुक्यातील सिरकाडा गावात हुमन नदीवरील ४६ हजार ११७ हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या मोठ्या प्रकल्पाला १९८३ पासून प्रशासकीय मान्यता मिळाली असतांनाही सदर प्रकल्प वनविभागाच्या परवानग्या न मिळाल्याने अद्याप अपुर्ण आहे. हा प्रकल्प जिल्ह्यातील शेतकरी तसेच वन्यप्राण्यांनाही लाभदायक ठरणार असल्याने सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल. तसेच दिंडोरा बॅरेज, पळसगाव आमडी उपसा सिंचन, बेंडारा मध्यम प्रकल्प तसेच इतर लघुप्रकल्पांची कामे देखील गतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी सिंचन विभागाला दिल्या. यासाठी मंत्रालयीन स्तरावरून आवश्यक पाठपुरावा व सर्वतोपरी मदत करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

पाटबंधारे विभागाकडील सिंचन पाणीपट्टी वसूली कमी असल्याने कालवे दुरूस्तीसाठी बिगर सिंचन पाणीपट्टीचा निधी वापरू देण्यास परवानगी मिळण्यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करावा. तसेच घोडाझरी, नलेश्वर, असोलामेंढा या १०० वर्षापेक्षा अधिक जुन्या तलावांची डागडुजी आणि स्ट्रक्चर दुरूस्ती करावी. पूर परिस्थितीमुळे क्षतिग्रस्त कालव्याच्या दुरूस्तीसाठी आलेल्या अडीच कोटी खर्चाची देयके जिल्हा नियोजनच्या निधीमधून आठ दिवसांत मंजूर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

जिल्हा जलसंधारण विभागाच्या १२६ कामांपैकी ५४ कामांवर स्थगिती असल्याने सदर कामे रद्द करून त्याऐवजी नवीन कामे घ्यावीत. जिल्हा परिषदेच्या मालकीची १६७८ मालगुजारी तलाव व ६६९ कोल्हापुरी बंधा?यांचा जलसंधारणासाठी पूर्ण क्षमतेने उपयोग व्हावा म्हणून आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती करण्यात यावी. तसेच सिंचन विहिरीचे अपुर्ण कामे पूर्ण करून नवीन कामे घेण्याच्या सूचना पालकमंत्री यांनी दिल्या.

जिल्ह्यात जलसंधारणाच्या सोयी सुविधा वाढविण्यासाठी आवश्यक निधी व रिक्तपद भरतीसाठी मनुष्यबळाची मागणी संबंधित विभागाने करून लवकरात लवकर कामे पुर्ण करण्याचे निर्देशही पालकमंत्री मुनगंटीवार यांनी याप्रसंगी दिले.

जिल्ह्याच्या ११.४४३ लक्ष हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ५.७६ लाख हेक्टर क्षेत्र लागवडी योग्य आहे. जिल्ह्याची एकूण सिंचन क्षमता २.७२ लाख हेक्टर आहे. सद्यस्थितीत १.४८ लाख हेक्टर क्षेत्रावर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली असून प्रत्यक्ष सिंचन ८१ हजार हेक्टरवर असल्याची माहिती पाटबंधारे विभागाचे अधिक्षक अभियंता पद्माकर पाटील यांनी दिली. तर मृद व जलसंधारण विभागांतर्गत सहा लघु पाटबंधारे तलाव, ७१ कोल्हापुरी बंधारे, ३०४ सिमेंट नाला बंधारे, ५ उपसा सिंचन, १५० उथळ कुपनलिका असे एकूण ५३६ योजनांचे काम पूर्ण झाले असून त्याद्वारे १२ हजार ३६० हेक्टर सिंचन निर्माण झाल्याची माहिती जिल्हा जलसंधारण अधिकारी सुभाष आकोसकर यांनी दिली.

# अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रकरणात आर्थिक साहाय्याची प्रकरणे तात्काळ निकाली काढा

## जिल्हाधिकारी विनय गौडा : जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक



**चंद्रपूर / प्रतिनिधी**
अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यात आर्थिक सहाय्याची पात्र प्रकरणे प्रलंबित न ठेवता तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीचा आढावा घेतांना ते बोलत होते. याप्रसंगी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी मुरूगानंथम एम., अपर जिल्हा पोलिस अधीक्षक रिना जनबंधू, जिल्हा समाजकल्याण अधिकारी सुरेश पेंदाम, समाजकल्याण निरीक्षक पुनम आसेगावकर, जिल्हा सरकारी वकील प्रशांत घट्टुवार, जिल्हा महिला व बालविकासचे परिविक्षा अधिकारी दिवाकर महाकाळकर प्रामुख्याने उपस्थित होते.

पोलिस विभागाने अशा प्रकरणात गुन्ह्याची नोंद केल्यावर समाजकल्याण विभागाला एफ.आय.आर. ची प्रत शिघ्रतेने द्यावी. तसेच तपास प्रलंबित असलेल्या गुन्ह्याचा व न्यायप्रविष्ठ प्रकरणाचा पाठपुरावा करून प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत आतापर्यंत १५९९ गुन्हे नोंदविले असल्याची माहिती समाजकल्याण विभागाने सादर केली. यात पोलिस तपासावर २५, तपास पूर्ण १२७, न्यायप्रविष्ठ १४११, ॲट्रॉसिटी कलम कमी केलेले ३५ तर पोलिस ?बेटेड समरी मधील एका गुन्ह्याचा समावेश आहे. तसेच आर्थिक सहाय्याची एकूण १३२६ प्रकरणे असून त्यात प्रथम हप्ता मंजूर केले ११३५ व द्वितीय हप्ता मंजूर केलेली १५९ अशी १२९४ प्रकारणे आहेत.

आर्थिक सहाय्य देणे शिल्लक असलेल्या प्रकरणात ३९ प्रथम हप्त्याची व ७ द्वितीय हप्त्याची अशी ४६ प्रकरणे प्रलंबित आहेत. आतापर्यंत आठ कोटी ३२ लाख ७१ हजार रकम आर्थिक सहाय्य म्हणून वितरीत करण्यात आली आहे.

## १८ आरोपींविरुध्द २४ गुन्ह्यांची नोंद

**चंद्रपूर/ प्रतिनिधी**
राज्य उत्पादन शुल्क विभागाद्वारे २३ व २४ नोव्हेंबर रोजी चंद्रपुर जिल्ह्यांतील अवैध दारु विक्री व हातभट्टी दारु निर्मिती, विक्री विरोधात मोहीम आयोजित करण्यात आली. यात १८ आरोपीविरुध्द २४ गुन्हे नोंदविण्यात आले तसेच १ लाख १५ हजार ७३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चंद्रपुर जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सर्व निरीक्षक, दुय्यम निरीक्षक व जवान तसेच नागपुर जिल्ह्यातील भरारी पथक क्रमांक १ यांचे समवेत भद्रावती, चिमुर, चंद्रपुर, सावली, नागभीड, गडचांदूर, सिदेवाही, वरोरा, बल्लारपुर, ब्रम्हपुरी, राजुरा या तालुक्यांत धाडी टाकुन दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत वरील कारवाई करण्यात आली. याप्रसंगी ब्रम्हपुरी भागात दोन परमीट रुमवर नियमभंग प्रकरणे देखील नोंदविण्यात आली.

सदर कामगिरी नागपुर उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उपआयुक्त मोहन वंदे यांचे आदेशान्वये तसेच चंद्रपुर जिल्ह्याचे राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक एम. एस. पाटील आदिंनी पार पाडली.

# वरोरा येथे १५ डिसेंबर ते १८ डिसेंबर दरम्यान पुरुष व महिलांचे राज्यस्तरीय वाली बॉल स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

**वरोरा / प्रतिनिधी**
कर्मयोगी बाबा आमटे यांच्या जयंतीनिमित्त स्फूर्ती स्पोर्टिंग क्लब वरोरा व महारोगी सेवा समिती आनंदवन यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेच्या मार्गदर्शनात १५ डिसेंबर ते १८ डिसेंबर यादरम्यान पुरुष व महिलांचे राज्यस्तरीय व्हॉलीबॉल सामने तथा सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन आनंद निकेतन महाविद्यालयाच्या पटांगणावर करण्यात आले आहे

या स्पर्धेदरम्यान महाराष्ट्रातील महिलांचे ३० तर पुरुषांचे ३५ वरिष्ठ व्हॉलीबॉल संघ सहभागी होणार आहे स्पर्धेकरिता आनंदनिकेतन महाविद्यालयाच्या पटांगणावर पाच व्हॉलीबॉल मैदाने तयार करण्यात येणार असून स्पर्धा दिवसा व रात्री विद्युत प्रकाश झोतात खेळवल्या जाणार आहेत स्पर्धेत ९०० पुरुष



महिला खेळाडू पंचव्यवस्थापक

प्रशिक्षक महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेचे पदाधिकारी सहभागी होणार आहे खेळाडूंची राहण्याची व जेवणाची व्यवस्था आनंदवनात करण्यात येणार आहे यासोबतच सायंकाळच्या सतरा नंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे स्पर्धेच्या ठिकाणी खाद्य वस्तू विक्री व इतर स्टॉल लावण्यात येणार आहे स्पर्धेदरम्यान अतुलनीय कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात येणार असून स्पर्धेला भेट देण्याकरिता अनेक मान्यवरांनी आपला होकार आयोजकाकडे दिला आहे स्पर्धेची तयारी महारोगी सेवा समिती द्वारा संचालित आनंदनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर मृणाल काळे स्फूर्ती स्पोर्टिंग क्लबचे अध्यक्ष डॉक्टर आर आर महाजन स्फूर्ती स्पोर्टिंग क्लबचे सचिव सुनील जवदंड स्पर्धेचे मुख्य संयोजक अनुप पोटे स्पर्धा संयोजक प्राध्यापक तानाजी बायस्कर यांच्या मार्गदर्शनात पदाधिकारी सदस्य व खेळाडू करीत आहे.

# सिएसटीपीएसच्या राख वाहिनीतील राख गळती थांबविण्यासाठी कायम स्वरुपी उपाययोजना करा : आ. किशोर जोरगेवार

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
सिएटीपीएसच्या राख वाहिनीतुन राखेची गळती होत असल्याने लगतच्या नागपूर(छोटा), विचोडा, चारगाव, मोरवा, ताडाळी, पडोली येथील शेती प्रभावीत होत असुन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे या गंभिर प्रकाराकडे गांभिर्याने लक्ष देत राख वाहिनीतील राख गळती थांबविण्यासाठी कायम स्वरुपी उपाययोजना करण्याच्या सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी सिएसटीपीएसच्या अधिकाऱ्यांना केल्या आहे. सोबतच पावसाळ्यात छोटा नागपूर आणि विचोडा येथे उद्भवणाऱ्या पुर परिस्थिती बाबतही उपायोजना करण्याच्या सूचना यावेळी आ. जोरगेवार यांनी केल्या आहे.



सिएसटीपीएसच्या राख वाहिनी लगत असलेल्या गावातील गावकऱ्यांनी आपल्या तक्रारी आमदार किशोर जोरगेवार यांच्याकडे केल्या होत्या. या संदर्भात आमदार किशोर जोरगेवार यांनी सिएसटीपीएसच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी सदर सुचना केल्या आहे. या बैठकीला सिएटीपीएसचे मुख्य अभियंता पंकज सपाटे, कार्यकारी अभियंता उरकुडे, माजी नगर सेवक बलराम डोडाणी माजी नगर सेवक बलराम डोडाणी यंग चांदा ब्रिगेडचे ग्रामिण तालुका अध्यक्ष राकेश पिंपळकर, छोटा नागपूरचे उपसरपंच ऋषभ दुपारे, छोटा नागपूरचे ग्रामपंचायत सदस्य परशुराम वाढई, विचोडा ग्रामपंचायत सदस्य बंडू रामटेके, संजु बोबडे, महादेव पिंपळकर, हरि वसींग, लहु रासेकर आदींची उपस्थिती होती.

मौजा छोटा नागपूर विचोडा, चारगाव, मोरवा, ताडाळी, पडोली येथील शेतकऱ्यांच्या शेतीलगत चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राची नवीन राख वाहीणी आहे. सदर राख वाहीणीतुन राख गळती होत असल्याने शेतालगत राखेचा ढीग लागला आहे. या राखेच्या ढिगाऱ्यामुळे शेतातील अतिरिक्त पाणी बाहेर जाण्याचा मार्गात अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे हे पाणी शेतातच साचत आहे. तसेच शेतात राख साचल्याने शेतीची सुपीकता कमी होत असून शेतीच्या पिकांवर विपरीत परिणाम होऊन शेतजमीन नापिक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी या गावातील शेतकऱ्याचे प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. ही बाब लक्षात घेता सदर राख वाहीणीची योग्य दुरुस्ती करून सुरु असलेली गळती कायमस्वरुपी थांबवावी अशा सुचना या बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी सिएसटीपीएसच्या अधिकाऱ्यांना केल्या आहे. तसेच शेतीतील पाणी वहन होण्याकरिता नालीचे बांधकाम करण्यात यावे, सदर गावातील रस्त्यावर नियमीत पाण्याचा छीडकाव करण्यात यावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानभरपाई देण्यात यावी आदी सुचना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या आहे.

# हंसराज अहीर राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षपदी

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री तथा भाजपा ओबीसी मोर्चा राष्ट्रीय उपाध्यक्ष हंसराज अहीर यांची राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षपदी महामहिम राष्ट्रपती यांचे व्दारा निवड करण्यात आली आहे. आपल्या राजकीय कारकिर्दीमध्ये हंसराज अहीर यांनी चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचे तब्बल ४ वेळा प्रतिनिधीत्व केले असुन केंद्र सरकारच्या सामाजिक हिताशी निगडीत अनेक महत्वपुर्ण समित्यांवर आपल्या संसदीय कारकिर्दीत उल्लेखनीय कार्य केले आहे.

राजकारणाला सामाजिक जोड देत हंसराज अहीर यांनी आपल्या प्रभावी संघटनात्मक कार्याव्दारे ओबीसी, भटके विमुक्त, अल्पसंख्यक समुदायातील मोठ्या वर्गाला भाजपाशी जोडण्याचे भरीव कार्य केले आहे. त्यांनी आपल्या उज्ज्वल संसदीय कार्यातून गरीब, शोषित, कष्टकरी, शेतकरी, कामगार व अन्य घटकांच्या सामाजिक उत्थानासाठी विशेष प्रयत्न करित न्याय मिळवून देण्यात मोलाचे योगदान दिले आहे. भाजपा ओबीसी मोर्चा राष्ट्रीय उपाध्यक्ष पदाची जबाबदारी अत्यंत प्रभावीपणे सांभाळून त्यांनी मागासवर्गीय समाजाला त्यांच्या न्याय हक्काची वेळोवेळी जाणीव करुन देत त्यांचे संघटन उभे करण्यात महत्वपुर्ण कार्य केले. त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याची तसेच विस्तृत अनुभवाची तसेच प्रत्येक जबाबदारीला न्याय देण्याची क्षमता ठेवणाऱ्या या नेतृत्वाची दखल घेत राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात आली आहे.



हंसराज अहीर यांची राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचे सर्वच स्तरातुन स्वागत करण्यात येत आहे. या निवडीबद्दल हंसराज अहीर यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष आभार मानत केंद्रीय नेतृत्वाने सोपविलेल्या या जबाबदारीला योग्य न्याय देवू असा विश्वास व्यक्त केला आहे.




## भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात

# २ ७५९ रक्तदात्यांचे रक्तदान व विविध सेवा कार्यक्रम













**चंद्रपूर / प्रतिनिधी**
भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा माजी जि. प. अध्यक्ष देवराव भोंगळे यांचा वाढदिवस २१ नोव्हेंबर ला जिल्हाभर मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्तानं लोकनेते, विकासपुरुष ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शक सेवापद्धतीला साजेसे असे जनसेवेचे विविध कार्यक्रम जिल्हाभर घेण्यात आले. यामध्ये चौदा ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरांमध्ये तब्बल २७५९ रक्तदात्यांनी रक्तदान करून महादान दिलं. एकाच दिवशी एवढ्या मोठ्या संख्येने रक्तदान करून रक्तदात्यांनी चंद्रपूर जिल्ह्यासाठी पुन्हा एकदा रक्तदानाचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

देवराव दादा भोंगळे मित्रपरिवारातर्फे शासकीय रक्तपेढी चंद्रपूर तथा डॉ. हेडगेवार रक्तपेढी नागपूर यांच्या सहकार्याने जिल्ह्यातील घुग्घुस, वरोरा, चंदनखेडा, भद्रावती, बंगाली कॅम्प (चंद्रपूर), इंदिरानगर (चंद्रपूर), बल्लारपूर, बिबी, कोरपना, राजुरा, जिवती, गोंडपिपरी, तोहोगाव, चिंतलधाबा येथे या शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये अठरा वर्षांपासुन रक्तदानाची अखंडित परंपरा चालवणाऱ्या घुग्घुस शहरात सकाळी नऊ वाजता सुरू झालेल्या शिबीराचा शेवट रात्री नऊ वाजता शेवटच्या १३४७ व्या रक्तदात्याकडून झालेल्या रक्तदानाने झाला. यासह वरोरा येथे १००, चंदनखेडा येथे ७७, भद्रावती येथे ५१, बंगाली कॅम्प(चंद्रपूर) येथे ५४, इंदिरानगर ६३ (चंद्रपूर), बल्लारपूर येथे १०५, बिबी येथे ८८, कोरपना येथे ११४, जिवती येथे ७१, राजुरा येथे ३३३, गोंडपिपरी येथे १५०, तोहोगाव येथे ७६ आणि चिंतलधाबा येथे १३० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

राजूऱ्यात विविध पक्षसंघटनांच्या तसेच अराजकीय भाच्यांनी 'लाडक्या देवराव मामासाठी' पुन्हा एकदा एकत्र येऊन तब्बल ३३३ रक्तदात्यांचा आकडा गाठला. मागील वर्षी सुद्धा वाढदिवसानिमित्त १७५३ रक्तदात्यांनी रक्तदान करून देशसेवा केली होती.

चंद्रपूर शहरात माजी उपमहापौर राहुल पावडे मित्रपरिवारातर्फे युवा व्याख्याते सोपान कनेरकर यांच्या जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याठिकाणी मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती पहायला मिळाली.

यासोबतच जिल्ह्यात रोग निदान शिबीर, महाआरती व रुद्राभिषेक, भोजनदान, वाचनालयाला स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकांचे वाटप, दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत सहभोजन,
विद्यार्थ्यांना नोटबुक व गरजूंना ब्लँकेटचे वितरण, रुग्णांना फटवाटप आणि चिंतलधाबा येथे नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना, माझ्या वाढदिवसाच्या निमित्याने जिल्हाभर भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तसेच मित्रपरिवाराने असे महारक्तदानाचे व जनसेवेचे कार्यक्रम राबवून आजचा दिवस सेवामय केला त्यासाठी मी सर्वांचा आभारी आहे. आज एवढ्या मोठ्या प्रमाणावर अनेक ठिकाणी महारक्तदान पार पडले.

कार्यकर्त्यांनी माझ्यासारख्या छोट्याश्या कार्यकर्त्याला शुभेच्छाभेट द्यावी म्हणून विविध सेवाभावी कार्यक्रमं घेतली, मोठ्या संख्येने रक्तदान शिबीरं पार पडले. यासोबतच माझ्या निरोगी दिर्घायुष्यासाठी प्रार्थना केली त्याबद्दल मला सदैव तुमच्या ऋणात रहायला आवडेल. असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी केले. यावेळी वाढदिवसानिमित्त सा. सह्यांद्रीचा राखणदार तर्फे काढण्यात आलेल्या स्थितप्रज्ञः देवरावदादा या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी संपादक आशीष घुमे व कार्यकारी संपादक सुरज घुमे उपस्थित होते.

### ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात ठिकठिकाणी संविधान दिन साजरा

# एक दिवस जरी देशात संविधान पूर्णतः लागू झाले तरी या देशातील सर्व समाजघटकांचे उत्थान होईल

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
२६ नोव्हेंबर हा संविधान दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा होतो. याच पार्श्वभूमीवर ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांनी ओबीसी समुदायाला घरोघरी गावोगावी संविधान दिन मोठ्या हर्षोल्लासात साजरा करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार जिल्ह्यातील विविध तालुक्यात संविधान दिन विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. शहरात सिव्हील लाईन येथे आयोजित कार्यक्रमात संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करुन विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्व समजावून सांगण्यात आले.

डॉ. अशोक जीवतोडे म्हणाले की, एक दिवस जरी देशात संविधान पूर्णतः लागू झाले तरी या देशातील सर्व समाजघटकांचे उत्थान होईल व देशातील बहुतांश समस्या निकाली लागेल. संविधान हाच जगण्याचा आधार असून देशातील शेवटच्या घटकाला न्याय देण्याची क्षमता ठेवते. तेव्हा संविधान दिन हा राष्ट्रीय सण समजून प्रत्येकांनी दरवर्षी असाच घर, कार्यालय, परिसर व समाजातून हा दिवस देशभक्तीच्या भावनेने साजरा करायला हवा. यावेळी ओबीसी व इतर समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. एम. सुभाष, नितीन कुकडे, विजय मालेकर, संजय सपाटे, कविता रंगारी, डॉ. आशीष



महातळे, डॉ. कुंदन पाटील, विनायक बोडाले, रविकांत वरारकर, रवि जोगी, वानखेडे, अमर बलकी, गणेश येरगुडे, कन्नाके, माया धमगाये, जोत्सना राजूरकर, मंजुळा डूडूरे, अशोक बुटले, सुरेंद्र अडबाले, देवेंद्र बलकी, सचिन मोहितकर, नरेंद्र धांडे, वैशाली पोडे, हेलवटे, अर्चना काळे, छाया उपगंलावार, पावडे सविता ठावरी, मुप्पावार, संदीप सातपुते, आकाश जुनघरी, स्वप्निल खनके, प्रशांत गाडगे, निळकंठ पायघन, प्रकाश जांभूळकर, योगेश पाचभाई, पी.एस. लांडे आदी उपस्थित होते.

भद्रावती येथे संविधान दिनानिमित्त स्थानिक बौध्द लेणी येथील सभागृहात संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. यावेळी नितीन खरवडे, राकेश खुसपुरे, अमोल नागपुरे जितू पारखी, अभय ठेपाले राजेश ताजने, दीपक कावटे, योगेश नागपुरे, भोला नागपुरे, अमोल ढोके, विकास डुकरे आनंद शिरसागर, संदीप गोखरे, भूषण बोडाले, सचिन नक्षिणे, रोशन खाडे, अभय ढाले, चेतन निब्रड आदी उपस्थित होते.

वरोरा येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. लक्ष्मणराव गमे, कौरासे, कावळे, बोरीकर, जोगी, गेडाम, अरुण जोगी, प्रणव उलमाले, खाणेकर, विनोद कारेकर, मत्ते, गाडगे, शेंडे, झाडे आदी उपस्थित होते.

चिमूर येथे न्यू राष्ट्रीय शाळा, चिमूर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आमडी या शाळांना संविधान उद्देश पत्रिकेची /प्रस्ताविका प्रतिमेच्या स्वरूपात भेट देण्यात आली. यावेळी एस. आर. खोब्रागडे, यु. एन.

- पोंभुर्णा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी बार असोसिएशनचे अध्यक्ष रंजीत खोब्रागडे, अजीत मंगळगिरीवार, शाम गेडाम, अविनाश वाळके, जीवने, मोहन चलाख, बबनराव गोरंतवार, अशोकराव गेडाम, जयपाल गेडाम, सुलभा पिपरे, अमरसिंह बघेल, वसंत भोयर, व्यंकटेश चलाख, प्रेमसिंग मुळे, योगेश पेन्टेवार आदी उपस्थित होते.
- बल्लारपूर येथे संविधान दिन प्रसंगी विद्यार्थ्यांना भाषण स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आली. आणि विजेत्या स्पर्धकांना बक्षीसे देऊन गौरविण्यात आले. मधुकरजी मत्ते, पंकज मत्ते, प्रकाश उरकुंडे, गजू उमरे, सुनील टोंगे, महेश पानघाटे, देविदास कुबडे, पुरुषोत्तम सातपुते, विकास खाडे, संदीप गौरकार, डेजूलीना मीनमुले आदी उपस्थित होते.

नवहाते, मेश्राम, रोकडे, लडी, वामन गुळदे, माजी सरपंच सुनील गुळदे, प्रफुल डरे, रामदास विताळे, चांदणखेडे, वरखेडे, डोंगरे, प्रकाश झाडे, गांधी बोरकर आदी उपस्थित होते.

घुग्घुस येथे मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मालेकर, संजय भोंगळे, उषा आगदारी, गणपत लभाने, विठोबा बोबडे, ज्ञानेश्वर काळे, किरण नक्षीने, अशोक पिदुरकर, पुंडलिक खनके, दामोदर ढेंगळे, योगेश निब्रड, गणपत लांडगे, सोमाजी घुत्ते, जनार्दन घबाडे, कांता बाघ, विद्या आत्राम, उषा बुटले, मीनाक्षी खानोरकर, विठोबा पोले, आदी उपस्थित होते.

ताडाळी येथे विद्यार्थ्यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. यावेळी भास्कर जिवतोडे, निखिलेश चामरे, आत्राम, पिदूरकर, भगत, बुचे, गोहोकर, बोबडे, बांबोडे, जुनघरे, साहिल धोंगडे, हरिषचंद्र जानवे आदी उपस्थित होते.

गोंडपिपरी येथे संविधान दिनानिमित्त प्रभात फेरी काढून संविधान चिरायू होवो, याकरीता शपथ घेण्यात आली. आयोजित कार्यक्रमात बळीराजा निकोडे, एस.एस. पठाण, बंडू दुर्गे, संतोष बांदूरकर, नंदकिशोर दिवसे, महादेव शेंद्रे, लाडे, किशोर पठाडे, एस एम बेताल, सुहास ठावरी, शांताराम काळे, माथने सर, अजय काळे, कोकाटे, तितरमारे, बोबडे, मोरे, नागापुरे, बोर्डे, विरुटकर, आदी उपस्थित होते.

# शासन, प्रशासनाने प्रकल्पग्रस्त व बेरोजगारांची थट्टा थांबवावी : रविंद्र शिंदे

### नवीन प्रकल्प उभारल्या जात नसल्यास शेतकऱ्यांच्या जमिनी परत करा

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
भद्रावती तालुक्यात गेल्या २८ वर्षापूर्वी सुमारे बाराशे हेक्टर जमीन संपादित करून सुध्दा या ठिकाणी होणारा प्रस्तावित निप्पॉन डेन्ड्रो प्रकल्प सुरू झाला नाही. यामुळे येथील प्रकल्पग्रस्त आणि तालुक्यातील जनतेत या प्रकल्पासाठी संपादित केलेल्या सुमारे बाराशे हेक्टर जमिनीवर उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाबाबत संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. यामुळे २८ वर्षापासून रखडलेल्या निप्पॉन डेन्ड्रो प्रकल्पा करीता संपादित केलेल्या बाराशे हेक्टर जमिनी संदर्भात केंद्र व राज्य शासन तसेच प्रशासनाने आपली भुमिका लवकरात लवकर स्पष्ट करावी. तसेच या जागेवर नवीन प्रकल्प उभारल्या जात नसल्यास शेतकऱ्यांच्या जमिनी तात्काळ परत करण्यात याव्या. अशी मागणी स्व. श्रीनिवास शिंदे मेमोरियल रविंद्र शिंदे चॅरिटेबल ट्रस्ट चंद्रपूरचे संस्थापक अध्यक्ष तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक सामाजिक कार्यकर्ते रविंद्र शिंदे यांनी केली आहे.

रविंद्र शिंदे पुढे म्हणाले की, २८ वर्षापूर्वी माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव आणि तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत भद्रावती शहराच्या दक्षिणेला सात किमी अंतरावर निप्पॉन डेन्ड्रो ह्या विज प्रकल्पाचा भुमी पुजन सोहळा पार पडला. या प्रकल्पासाठी पिपरी ( देश. ), ढोरवासा, तेलवासा, कुनाडा, टोला, चारगाव, विजासन, लोणारा व चिरादेवी शिवारातील सुमारे बाराशे हेक्टर जमीन संपादित करण्यात आली. परंतु अठ्ठावीस वर्षाचा प्रदिर्घ कालावधी लोटूनही या ठिकाणी कुठलाही प्रकल्प सुरू झाला नाही.

या ठिकाणी अमुक प्रकल्प येणार, तमुक कारखाना सुरू होणार अश्या चर्चा यापूर्वी झालेल्या आहे.परंतु प्रत्यक्षात कुठलाही प्रकल्प या ठिकाणी सुरू झाला नाही . यामुळे येथील जनतेची व विशेषत : प्रकल्पग्रस्त परीवार, शेतकरी आणि सुशिक्षित बेरोजगारांची वेळोवेळी थट्टा करण्यात येत आहे. शासन व प्रशासनाने ही घोर थट्टा थांबवावी. असे रविंद्र शिंदे यांनी यावेळी म्हटले आहे.



सततच्या अतिवृष्टीमुळे या परीसरातील जनता त्रस्त झालेली आहे. शेत पिकांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जिवीत हानी होत आहे. उच्च शिक्षित तरूणांच्या हातात काम नसल्याने त्यांची मानसिकता खालावत आहे.परीसरातील कोळसा खाणी बंद होत आहे. काही सुरु असलेल्या कोळसा खाणीतील समस्यांची श्रृखंला थांबण्याचे चिन्हे दिसत नाही. प्रस्तावित खाजगी कोळसा खाण प्रकल्पात स्थानिकांना किती प्रमाणात सामावून घेणार ही बाब अनिश्चीत आहे. या सर्व समस्यांना येथील जनतेला सामोरे जावे लागत असतांना, निप्पॉन डेन्ड्रोची स्थिती भिजत घोंगडे सारखी आहे. या परिस्थितीत अठ्ठावीस वर्षापासून रखडलेल्या निप्पॉन डेन्ड्रो प्रकल्पा करीता संपादित केलेल्या बाराशे हेक्टर जमिनी संदर्भात केंद्र व राज्य शासन तसेच प्रशासनाने आपली भुमिका लवकरात लवकर स्पष्ट करणे आवश्यक आहे. तसेच या जागेवर नवीन प्रकल्प उभारल्या जात नसल्यास शेतकऱ्यांच्या जमिनी तात्काळ परत करणे सर्वांच्या हिताचे असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते रविंद्र शिंदे यांनी म्हटले आहे.

सह्याद्री चा राखणदार साप्ताहिक वृत्तपत्र मालक , प्रकाशक , संपादक आशीष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टिसर्व्हिसेस कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून मुद्रित करून मातृछायाभवन कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही. यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालयाअंतर्गत होईल.
A weekly newspaper `SAHYADRI CHA RAKHANDAR` printed by *Suraj Bhaktraj Ghume* ,sahyandri multiservices, karmveer ward , warora 442907 (M.H ) on behalf of Ashish Maroti Ghume owner, publisher & Editor of sahyadri cha rakhandar` matruchaya bhawan` , karmveer ward warora 442907(M.H) . the editer may not be agree with the published content . in case any objection , the content will be redressed under warora court RNI NO : MAHMAR/2018/77866
CONTACT NUMBER :- Ashish Ghume 9011708840, Suraj Ghume 9673560360 EMAIL :- sahyandrinews@gmail.com EPAPER :- epaper.sahyandrinews.com